# -:नागरीकांची सनद:-

# शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रस्तावना:-

शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद यवतमाळ मार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे मुख्य उद्दिष्टे शिक्षणाचा दर्जा उंचावणे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढवीणे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे व ती टिकवणे असून योजनेचा फायदा प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहचून शैक्षणिक विकास साधण्याचा विभागाचा सदैव प्रयत्न असतो.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE 2009) अन्वय 6 ते 14 वयोगटातील बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे.शिक्षणापासून वंचित असणाऱ्या बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेता यावे शिक्षणाच्या संख्यात्मक विकासाबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता दर्जामध्ये सुधारणा व्हावी या उदेशाने प्राथमिक शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. विद्यार्थी यांना मोफत शिक्षणाच्या सोयी सवलती पुरविणे,शाळा खोली बांधकाम राज्यस्तरीय दिल्या जाणाऱ्या साधनांचा शाळा स्तरावर पोचविणे तसेच शाळांच्या सहलीचे नियोजन करणे.

शिक्षण विभाग (प्रा) हा जिल्हा परिषदेच्या प्रशासनातील महत्वाचा विभाग आहे. जिल्हातील 6 ते 14 वयोगटातील शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी काम केले जाते. यात प्राथमिक शाळा,उच्च प्राथमिक शाळा व जिल्हा परिषदेच माध्यमिक शाळांचे नियंत्रण केले जाते.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, स्काऊट गाईड, शालेय पोषण आहार, समग्र शिक्षा अभियान शिक्षकांना शैक्षणिक सहित्य निमिर्तीसाठी मदत व विविध प्रशिक्षणे,शाळाचे संगणकीकरण, मोफत पाठयपुस्तके,मोफत गणवेश वाटप,प्रधान मंत्री पोषण शक्ती योजना, स्पर्धा परीक्षा,नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा व अन्य परिक्षेचे आयोजन केले जाते.

दर वर्षी ‘महादीप’ परीक्षा योजना इ.5 वी ते 8 वी विद्यार्थ्या करिता राबविण्यात येणारी योजना जि.प.मार्फत ‘महादीप’ पुस्तिकेची निर्मिती व प्रकाशन, ‘महादीप’ शाळास्तर,केंद्रास्तर, तालुकास्तर,जिल्हास्तर परीक्षा घेणे, जिल्हास्तर परीक्षेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विमानवारी अंतर्गत शैक्षणिक सहल,जिल्हा व तालुकास्तर खेळ व क्रिडा महोत्सव-तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय खेळ घेणे,विद्यार्थ्यांना क्रिडा गणवेश वितरीत करणे. जिल्हा व तालुकास्तर कब बुलबुल योजना-मेळाव्याचे नियोजन व प्रत्यक्ष मेळावे घेणे. बाला योजना-जि.प.सेस मधुन प्रत्येक तालुक्यातील एक शाळा बाला योजने अंतर्गत आदर्श शाळा तयार करणे. महावाचन उत्सव सर्व शाळांमध्ये राबविण्यात आले, मोफत पाठयपुस्तक :- वर्ग 1 ते 8 वी च्या सर्व मुले व मुलीनां लाभ देण्यात येते. वर्ग 1 ते 8 च्या अनुसुचित जमातीच्या मुली व मुलांना सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती दिली जाते.निपूण भारत अभियान इयत्ता 2 री ते 5 वी च्या प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी निपुण भारत अभियान राबविण्यत येते. बाल विवाह निर्मुलनसाठी प्रशिक्षित व प्रचार करण्यात आला, तंबाखु मुक्त शाळा जनजागरण करण्यात येते.

शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा वाढीचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन करण्यासाठी शिक्षक पुरस्कार-प्रत्येक तालुक्यामुधन उतकृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचे प्रस्ताव मागविणे त्या मधुन जिल्हास्तर समिती मार्फत निवड करून पुरस्कार वितरीत करणे.विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व गुणवंत विदयार्थी भाविष्यात तयार व्हावे. म्हणुन गुणवंत विदयार्थी पुरस्कार देण्यात येते.

शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये टिकवून ठेवण्यासाठी दर्जेदार व गुणवत्ता पुर्ण शिक्षण देणे. मोफत पाठयपुस्तक/गणवेश सुविधा 100 % पटनोंदणी करणे.

समग्र शिक्षा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रम :- शालेय इमारती, वर्गखोली बांधकाम, स्वच्छता गृह, विद्युतीकरण, संरक्षण भिंत, पिण्याचे पाणी, दिव्यांग मुलांसाठी रॅम्प, हॅडवाश स्टेशन, वर्ग खोली दुरूस्ती, वैद्यकीय सुविधा दिव्यांग समावेशित शिक्षण.पी.एम.श्री. शाळा योजना यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण 42 पी.एम.श्री शाळा मंजुर झाल्या असून इतर शाळेच्या दुष्टीकोणातून आदर्श शाळा निर्माण करणे.

## शाळाव्यवस्थापन समिती :-

शाळेच्या गुणवत्तेकरीता लोकसहभाग वाढवीणे. शाळाबाह्य मुलांना शाळेमध्ये आणणे व विद्यार्थ्यांना टिकवणुक करून त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे व 100% पटनोंदणी करणे, शालेय कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी समितीचे सक्षमीकरण करणे. शाळेच्या कार्यामध्ये लोकांचा सहभाग घेऊन शाळेचा सर्वागिण विकास घडवून आणणे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना ही सन 1995 पासुन राज्यात राबविण्यात येत असुन जि.प.यवमाळ अंतर्गत जि.प शाळा/खाजगी अनुदानित शाळा/अंशत:अनुदानित शाळा शिक्षण घेणाऱ्या वर्ग 1 ते 8 विद्यार्थ्यांनी पोषण आहार देण्यत येतो.

या योजने मध्ये तांदूळ मोफत शासनामार्फत पुरवठा करण्या येत असुन धान्यादी साहित्य मा.शिक्षण संचालक प्राथमिक यांचे मार्फत नियुक्त पुरवठादारामार्फत शाळास्तरावर दिल्या जाते. सदर तांदुळ व धान्यादी सहित्याचा वाटप करून शाळा व्यवस्थापन समिती मार्फत नियुक्त बचत गटामार्फत विद्यार्थ्यांना रोज शिजवून शाळेत आहार देण्यात येते.

**शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद,यवतमाळ या कार्यालयाची रचना**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

▼

उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)

▼

अधिक्षक (राजपत्रित)

**कार्यालयीन आस्थापना**

सहाय्यक प्रशासन अधिकारी -1

▼

कनिष्ठ प्रशासन अधिकारी-2

▼

उच्च श्रेणी लघुलेखक

▼

निम्न श्रेणी लघुलेखक

▼

वरिष्ठ सहाययक

▼

कनिष्ठ सहाययक

▼

वाहन चालक

▼

परिचर

**योजना**

उपशिक्षणाधिकारी (समग्र)

▼

विस्तार अधिकारी (शिक्षण) 6

**शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद,यवतमाळ**

**नागरीकांची सनद तयार करुन प्रसिध्द करणे**

**शासन परिपत्रक साप्रवि/नासद-२०११/१८/अ/दिनांक ६ सप्टेंबर २०११**

**नागरिकांसाठी राबविण्यात येणा-या योजनांबाबत.**

| अ क्र | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकारी यांचे नाव हुद्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **या विभागामार्फत वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येत नाहीत.** | | | | |
| 1 | शाळा प्रवेश प्रक्रिया (RTE/सरकारी) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | 15 दिवस | उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती. |
| 2 | शाळा दाखला देणे | शाळा मुख्याध्यापक | 3 दिवस | संबधित गट शिक्षणाधिकारी |
| 3 | शाळा सोडल्याचा दाखला (LC) | शाळा मुख्याध्यापक | 3 दिवस | संबधित गट शिक्षणाधिकारी |
| 4 | विद्याथ्यांचे नांव नोदंणी बदल | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | ५ दिवस | उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती. |
| 5 | शिष्यवृत्ती फॉर्म स्विकारणे व प्रक्रिया | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | 15 दिवस | उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती. |
| 6 | विद्यार्थ्यासाठी UNIC ID निर्माण. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | 10 दिवस | उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती. |
| 7 | पालकांच्य तक्रारीचे निराकरण | संबधित गट शिक्षणाधिकारी | 15 दिवस | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) |
| 8 | निर्गम उतारा | शाळा मुख्याध्यापक | 3 दिवस | संबधित गट शिक्षणाधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | दाखल खारीज नोंदवहीचा उतारा | शाळा मुख्याध्यापक | 3 दिवस | संबधित गट शिक्षणाधिकारी |
| 10 | लोकआयुक्त प्रकरणे निकाली काढणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | १५ दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 11 | जिल्हा स्तरावरील तथा विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाची तक्रारी निकाली काढणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | १५ दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 12 | P.G.PORTAL/आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निकाली काढणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | 7 दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 13 | देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्रशासकिय/ तांत्रिक मंजुरी देणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | ७ दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 14 | आमदार/खासदार /मंत्री महोदयाकडील प्राप्त प्रकरणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | १५ दिवस | मुख्य कार्यकारी अधिकारी |

(प्रकाश मिश्रा)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,यवतमाळ.